४५५

जा.क्र/कृ.आ./१३-१४/मार्गदर्शकसुचना/फलो-४/ /२०१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५, दिनांक ८/४/२०१५.

**प्रति,**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

**विषयः- राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान**
सन २०१३-१४ मधील प्रकरणांबाबत करावयाची कार्यावही.

**संदर्भः-** १) शासन निर्णय क्र/सुसिंयो-१६१२/प्र.क्र.१/४अे, दि.२९ /१०/२०१२
२) शासन निर्णय क्र/सुसिंयो-२११४/प्र.क्र.९३/४अे, दि.२९ /११/२०१४
३) या कार्यालयाचे जा.क्र/कृ.आ./१३-१४/मार्गदर्शकसुचना/फलो-४/७९८/२०१४,दि. ०९/१२/२०१४.
४) शासन पत्र क्र.सुसिंयो-२११४/प्र.क्र.२९८/४अे, दिनांक ५/०१/२०१५.
५) या कार्यालयाचे जा.क्र/कृ.आ./फलो-४/१३-१४/सुसिंयो/४६/२०१५ दि. २१/१/२०१५.
६) मा.अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांची आढावा बैठक दिनांक २०/०४/२०१५.
७) शासन पत्र क्र.सुसिंयो-२११५/प्र.क्र.१३३/४अे, दिनांक २१/०४/२०१५.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात राज्यातील शेतकऱ्यांनी सुक्ष्म सिंचन संच बसविलेले असून त्यांचे अनुदान प्रलंबित राहिलेले आहे. यासाठी निधी उपलब्द करुन देण्याची शासनाकडे मागणी करण्यात आली होती. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सुमारे ४०० कोटी रक्कमेचे सुक्ष्म सिंचन संच बसविलेले असल्याचा अंदाज असून शासनाने केंद्र हिस्स्यापोटी रु.३३० कोटी निधीची तरतूद ग्रामीण पायाभूत विकास निधी मधून केली आहे. सदरचा निधी टप्प्या टप्प्याने उपलब्द होणार आहे. हा निधी केंद्र हिस्सा पोटी ८० ट्क्के या प्रमाणात उपलब्ध करुन दिलेला असुन उर्वरीत २० टक्के निधीची तरतुद जिल्हा नियोजन समिती मार्फ़त जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावयाची आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या शेतकऱ्यांची ऑनलाईन प्रणालीवर नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती व तशा सूचना संदर्भ क्र.३, ४ व ५ अन्वये देण्यात आल्या होत्या. वर नमूद केल्या प्रमाणे शासनाने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचासाठी निधीची तरतूद केली आहे. त्यामुळे आता सुक्ष्म सिंचन संचाची इनव्हाईस एंन्ट्री, मोका तपासणी, अनुदान निश्चिती, अनुदान अदायगी या सर्व टप्प्यावरील कार्यवाहीची तरतूद/सुविधा ई-ठिबक प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांनी दिनांक २०/०४/२०१५ रोजी मुंबई येथे घेतलेल्या आढावा बैठकी दरम्यान सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचाच्या प्रलंबित प्रकरणांसाठी निधीची तरतूद झाली असल्याने सदर प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने सर्व कार्यवाही पूर्ण करण्याचा सूचना दिल्या आहेत. त्याच अनुषंगाने संदर्भ क्र. ७ अन्वये शासनाने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचाची मोका तपासणी करुन अनुदान वितरणाच्या दृष्टिने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सन २०१३-१४ मध्ये बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचाची अनुदान प्रकरणे आवश्यक त्या कागदपत्रासह **दि.१५/०५/२०१५** पर्यंत सादर करण्याबाबत प्रसिध्दी द्यावी, जेणे करुन शेतकरी व वितरकांकडून प्रकरणे प्राप्त होतील
२. तालुका कृषि अधिकारी यांनी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचाची यादी संच बसविलेल्या दिनांकाच्या क्रमवारी नुसार, कंपनी प्रतिनीधी /संबंधीत वितरक यांच्या स्वाक्षरीने दोन दिवसात खालील प्रपत्रात प्राप्त करुन घ्यावी.

| अ .क्र | तालुका | गाव | शेतक-याचे पूर्ण नाव ,पत्ता व भ्रमणध्वनी | सर्व्हे क्र./ गट क्र. | पिकाचे नाव | ठिबक संच लॅटरल अंतर (मी)/ तुषार संच प्रकार | संच बसविलेले क्षेत्र (हेक्टर) | बिल क्रमांक व दिनांक | बिलानुसार आलेला खर्च | वितरकाचे नाव, पत्ता आणि भ्रमणध्वनी क्रमांक | सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

जर वर नमुद केल्याप्रमाणे माहिती आणि बिलांची स्वाक्षरीत छायांकीत प्रत वितरकाने विहित मुदतीत दिली नाही तर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांची सन २०१५-१६ साठी नोंदणी / नुतनीकरण करु नये .तसेच या कार्यालयाचे जा.क्र कृआ/फ़लो-४/सुसियो/२०१२/दि. ०४/०३/२०१५ अन्वये दिलेल्या सुचना नुसार वितरकासोबत करावयाच्या करारनाम्यामध्ये या बाबीचा अंतर्भाव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावा.

३. यादीसोबत सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या बिलांची छायांकीत प्रत वितरकाने स्वाक्षरीत करुन जोडावी.

४. तालुका कृषि अधिकारी यांनी संबंधीत वितरकाकडून प्राप्त यादीमधील शेतकरीनिहाय शेतक-याने बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचाच्या बिलांच्या छायांकीत प्रती वितरकाने स्वाक्षरीत केलेल्या आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी.

५. उपरोक्त संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयान्वये राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांतर्गत सन २०१२-१३ या वर्षासाठी मंजूर केलेले सुक्ष्म सिंचन संचाचे दर शासनाने संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयान्वये सन २०१३-१४ साठी लागू केले आहेत . त्यामुळे बिलांमधील घटकांचे दर सन २०१२-१३ प्रमाणे आहेत याची खात्री तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी आणि जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावी. (सन २०१२-१३ या वर्षासाठी मंजूर केलेले सुक्ष्म सिंचन संचाचे दर कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या संकेत स्थळावर पुढील प्रमाणे उपलब्ध आहेत...- Scheme - Guide line - Horticulture- मार्गदर्शक सुचना - वर्षानुसार शोधा (२०१२-१३) - राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अंमलबजावणी मार्गदर्शक सूचना - परिशिष्ठ १ ते ३.)

६. तालुका कृषि अधिकारी यांनी वितरकाकडून वर नमुद केल्याप्रमाणे बिलांच्या छायांकित प्रतीसह प्राप्त झालेल्या यादीतील **संचाची मोका तपासणी,** यादी प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून २ दिवसाच्या आत कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक /मंडल कृषि अधिकारी यांच्याकडून करुन घ्यावी. यासाठी तालुका कृषि अधिकारी यांनी प्रस्तावाची संख्या व कर्मचा-यांचा कामाच्या व्यापाचा विचार करुन कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक/मंडल कृषि अधिकारी निहाय मोका **तपासणीचे लेखी आदेश काढावे.** मोका तपासणी करण्यासाठी उपरोक्त तीनही संवर्गाच्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या कामाच्या व्याप्तीचा आढावा घेवून मोका तपासणीचे नियोजन व सनियंत्रण तालुका कृषि अधिकारी यांनी करावयाचे आहे. मोका तपासणी अहवालावर लाभार्थीची / त्याच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी घ्यावी.

७. वितरकांकडुन उपरोक्त प्रमाणे यादी व बिल इनव्हाईस मिळाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी सोबत **सहपत्रीत केलेल्या विहित नमुन्यात व जोडपत्रात** शेतकऱ्यांचा **अनुदान प्रस्ताव** संबंधीत कृषि सहाय्यकाकडुन तयार करुन घ्यावयाचा आहे. यासाठी सोबत जोडलेल्या अनुदान प्रस्तावाच्या छायांकित प्रति किंवा सॉफ्टकॉपी तालुका कृषि अधिकारी यांनी कृषि सहाय्यक यांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन द्याव्यात.यासाठीचा खर्च अकस्मीत निधीतुन भागवावा.

८. अनुदान प्रस्तावासाठी आवश्यक असणारे अभिलेख/कागदपत्रे कृषि सहाय्यक यांनी खालील प्रमाणे उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत.

| अ.क्र | कागदपत्रे | कोणाकडुन घ्यावयाची |
|---|---|---|
| १ | ७/१२, ८अ, पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत. | शेतकऱ्यांकडुन |
| २ | मोका तपासणी अहवाल व सुक्ष्म सिंचन आराखडा | कृषि सहाय्यक यांनी मोका तपासणी न केलेल्या प्रकरणी , मोका तपासणी केलेल्या कृषि पर्यवेक्षक /मंडळ कृषि अधिकारी यांचे कडुन |
| ३ | बील इनव्हाईस | वितरकांकडुन- तालुका कृषि अधिकारी कार्यालयास सादर केलेल्या यादीतुन |
| ४ | पाणी /मृद तपासणी अहवाल | तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधुन |
| ५ | अनुदानाचा दाखला | मंडल कृषि अधिकारी/ तालुका कृषि अधिकारी |
| ६ | शेतकऱ्यांची सर्व प्रमाणपत्रे | कृषि सहाय्यक यांनी शेतकऱ्याकडुन प्राप्त करुन घ्यावीत. |

वरील प्रमाणे सर्व कागदपत्रे जमा करुन कृषि सहाय्यक यांनी शेतकऱ्यांचे अनुदान प्रस्ताव तयार करुन मंडल कृषि अधिकारी यांचे मार्फत तालुका कृषि अधिकारी कार्यालयात सादर करावेत.

९. सन २०१२-१३ पासुन सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी संगणक प्रणालीचा (ऑनलाईन ई-ठिबक) अवलंब करण्यात येत आहे. सन २०१३-१४ मध्ये बसविलेल्या सुक्ष्म सिंचन संचासाठी सुद्धा " ई-ठिबक" या आज्ञावलीचा अवलंब बंधनकारक आहे.

१०. कृषि सहाय्यकाकडुन सुक्ष्म सिंचन संच बसविलेला अनुदान प्रस्ताव (सर्व जोडपत्रासह) प्राप्त झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांच्या Log-in मधुन ई-ठिबक ऑन लाईन प्रणालीतील पुढील टप्प्यानुसार तालुका कृषि अधिकारी कार्यालयातून एकाच वेळी भरावेत.

- यादीतील ज्या शेतकऱ्यांची ऑनलाईन प्रणालीवर नोंदणी झाली नाही त्या शेतकऱ्यांची ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत Beneficiary Entry करावी. (मिळणारा Beneficiary id अनुदान प्रस्तावावर लिहावा) तसेच शेतकऱ्यांच्या अर्जावरुन ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत Application Entry करावी. (मिळणारा Application id अनुदान प्रस्तावावर लिहुन ठेवावा)
- ज्या शेतकऱ्यांची यापूर्वीच ऑनलाईन प्रणालीत नोंदणी झालेली आहे व त्यांना Beneficiary id व Application id मिळाला आहे त्या शेतकऱ्यांची पुन्हा नोंदणी न करता त्यांच्या Beneficiary id व Application id वरुन ऑनलाईन प्रणालीत त्या पुढील टप्प्यांवरील कार्यवाही करावी.
- ई-ठिबक प्रणालीवर शेतक-याचे अर्ज भरणे आणि त्यानुसार पूर्वसंमती देण्याच्या दोन टप्प्याचे एकत्रिकरण करण्यात आले असल्याने या शेतक-यांना पूर्वसंमती देण्याची आवश्यकता नाही.
- ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत Eligibility scruitiny करुन फक्त Bill invoice ची Entry करावी. ( बिल इनव्हाईसची ऑनलाईन प्रणालीवर Entry आता वितरकांऐवजी तालुका कृषि अधिकारी यांनीच करावयाची आहे. तसेच ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीवर बिल इनव्हाईसची घटकनिहाय Entry करण्याची गरज नाही. वितरकाकडुन प्राप्त **बिलाची फक्त एकुण रक्कम** ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत भरावी . यासाठी ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत आवश्यक ते बदल करण्यात आले आहेत.)
- पासबुकाच्या प्रतीवरुन Bank account verification ची entry ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत करावी.
- मोका तपासणी- अनुदान प्रस्तावातील मोका तपासणीवरुन ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत नोंद घेण्यात यावी.
- ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत वेगवेगळ्या टप्प्यावरील मिळणारे Print out घ्यावेत व ते अनुदान प्रस्तावास जोडावेत.
- **वरील सर्व टप्पे एकाच वेळी अनुदान प्रस्तावावरुन ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत तालुका कृषि अधिकारी यांच्या Log-in मधुन भरुन ,** प्रस्ताव उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयास फ़ॉरवर्ड करावा.

११. उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयातुन अनुदान परिगणणेची पडताळणी करुन प्रस्ताव ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीमधून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास अनुदान शिफ़ारसीसह फ़ॉरवर्ड करावा.

१२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने प्रस्तावास मंजुरी देऊन RTGS द्वारे शेतक-यांच्या बॅंक खात्यावर अनुदान जमा करुन त्याची नोंद ई-ठिबक ऑनलाईन प्रणालीत घ्यावी.

**अनुदान परिगणना -**

१३. लाभार्थीचे अनुदान बॅंक खात्यात आर.टी.जी.एस. द्वारे वर्ग करण्यात येणार असल्याने लाभार्थीचे बॅंक खाते, राष्ट्रीयकृत बॅंकेत किंवा ज्या बॅंकेत आर.टी.जी.एस प्रणालीची सुविधा आहे तसेच एन.बी.एफ.सी (Non-banking financial company) येथेच असणे आवश्यक आहे.

१४. अनुदान परिगणनेसाठी संदर्भ क्र.१ मधील सन २०१२-१३ साठी मंजूर केलेली ठिबक सिंचन संचाच्या विविध लॅटरल अंतरासाठी Annexure - II मधील व तुषार सिंचन संचासाठी मंजूर केलेली Annexure - III मधील संच उभारणी खर्च मर्यादा अंतिम समजण्यात याव्यात.(सुलभ संदर्भासाठी Annexure - II व Annexure - III सोबत जोडले आहेत)

१५.एका लाभार्थीस कमाल ५ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत अनुदान देय राहील.

१६. सन २०१३-१४ मध्ये सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या लाभार्थीचे देय असणारे अनुदान प्रलंबीत राहणार नाही यांची जिल्हाअधिक्षक कृषि अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

१७. केंद्र शासनाने सन २०१०-११ मध्ये निर्गमित केलेल्या राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानाच्या मार्गदर्शक सुचना तसेच त्यानंतर त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा / बदल, हा कार्यक्रम राबविताना लागु राहतील.

१८. **अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी ६० टक्के आणि बहू भूधारकांसाठी ५० टक्के अनुदान देय राहील.**

मोका तपासणी वेळेत करण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावर उपलब्ध करून दिलेल्या आकस्मिक खर्चाच्या निधीचा वापर करावा. या कामासाठी आवश्यक तेवढी वाहने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून संबधीत तालुका कृषि अधिकारी यांनी भाडेतत्वावर उपलब्ध करून घ्यावीत. त्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांच्या मागणीनुसार त्याच्या स्तरावर उपलब्ध करून दिलेला आकस्मिक खर्चाचा निधी त्यांना उपलब्ध करून द्यावा.

उपरोक्त सूचना सर्व संबंधीताच्या निदर्शनास आणून द्याव्यात.सदर बाबीस प्रथम प्राधान्य देवून मोहिम स्वरुपात कार्यवाही करावी.यासाठी जिल्हास्तरावर खास बैठक घेऊन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मार्गदर्शन करावे जेणेकरुन उपलब्ध होणारा निधी पारदर्शक पध्दतीने व बिनचूकपणे खर्च होईल व दिलेला निधी व्यपगत होणार नाही याची दक्षता घ्यावी.

मा.आयुक्त कृषि यांच्या मान्यतेने.

**संचालक (फलोत्पादन)**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५.
पुणे - ४११ ००५.

**प्रत-**

मा.अपर मुख्य सचिव( कृषि व पणन) यांना माहितीस्तव सादर..

**प्रतिलिपिः**

विभागीय कृषि सहसंचालक (सर्व) यांना माहितीस्तव अग्रेषित

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर प्रकरणी वेळोवेळी आढावा घेऊन या कार्यक्रमाचे सनियंत्रण करावे.

## ANNEXURE-II

**Indicative Cost of Installing Drip Irrigation System for calculation of subsidy 2012-13 .**

(Cost in Rs./ ha.)

| Lateral Spacing (m x m) | Area (ha.) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0.2 | 0.4 | 1 .00 | 2 .00 | 3 .00 | 4 .00 | 5 .00 |
| 12 x 12 | 7483 | 13308 | 18592 | 29928 | 46467 | 57809 | 73611 |
| 10 x 10 | 7737 | 13809 | 19834 | 32323 | 50128 | 62787 | 79831 |
| 9 x 9 | 7922 | 14169 | 20707 | 34039 | 52704 | 66294 | 84219 |
| 8 x 8 | 8107 | 14634 | 21855 | 36217 | 56087 | 70893 | 89964 |
| 6 x 6 | 8939 | 16177 | 26551 | 44387 | 71715 | 86970 | 109129 |
| 5 x 5 | 9516 | 17575 | 30143 | 51438 | 74334 | 94465 | 126925 |
| 4 x 4 | 10648 | 18223 | 31793 | 55725 | 86926 | 113812 | 135459 |
| 3 x 3 | 11572 | 19662 | 36551 | 63269 | 97448 | 122553 | 153441 |
| 2.5 x 2.5 | 14565 | 26465 | 52160 | 95083 | 145227 | 203823 | 248954 |
| 2 x 2 | 18001 | 31048 | 63598 | 123441 | 179332 | 249134 | 305797 |
| 1.5 x 1.5 | 21230 | 35430 | 74437 | 141858 | 211855 | 292595 | 360002 |
| 2.5 x 0.6 | 14523 | 25174 | 52764 | 98294 | 149601 | 209687 | 257454 |
| 1.8 x 0.6 | 17720 | 31028 | 67282 | 128657 | 193096 | 265004 | 329979 |
| 1.2 x 0.6 | 22745 | 41466 | 93545 | 179261 | 270768 | 367308 | 459463 |

| Annexure III | | | | |
|---|---|---|---|---|
| **Indicative cost of Portable / Semipermenent Sprinkler Irrigation System for calculation of subsidy 2012-13 (Cost in Rs.)** | | | | |
| | **Portable Sprinkler** | | | **Semipermenent Sprinkler** |
| **Area** | **63 mm** | **75 mm** | **90 mm** | |
| up to 0.4 ha | 10074 | NA | NA | 19615 |
| More than 0.4 ha - 1ha | 16551 | 19044 | NA | 31832 |
| More than 1.0 ha- 2 ha | 23735 | 27280 | NA | 60699 |
| More than 2.0 ha- 3 ha | NA | NA | 35851 | 81929 |
| More than - 3.0 ha - 4 ha | NA | NA | 45302 | 104689 |
| More than 4.0 ha - 5 ha | NA | NA | 51199 | 127003 |

**Indicative Cost of Micro & Mini Sprinkler Irrigation System for calculation of subsidy 2012-13 (Cost Rs.)**

| Area (Ha.) | Micro Sprinkler | Mini Sprinkler |
|---|---|---|
| | **Specing 5x5m** | **Specing 10x10m** |
| 0.20 | 17019 | NA |
| 0.40 | 25750 | 35968 |
| 1.00 | 51245 | 74097 |
| 2.00 | 90070 | 139142 |
| 3.00 | 129830 | 211289 |
| 4.00 | 175315 | 271958 |
| 5.00 | 221628 | 333150 |

**Indicative Cost of Large Volume Sprinkler for calculation of subsidy 2012-13 (Raingun)**

| Area | 63mm | 75mm | 90mm |
|---|---|---|---|
| More than 0.4 ha - 1ha | 24940 | 30011 | NA |
| More than 1.0 ha- 2 ha | NA | 38075 | NA |
| More than 2.0 ha- 3 ha | NA | NA | 54112 |
| More than - 3.0 ha - 4 ha | NA | NA | 62720 |
| More than 4.0 ha - 5 ha | NA | NA | 68878 |

## राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान अंतर्गत सन २०१३-१४ साठी अनुदान मागणी प्रस्ताव

| | |
|---|---|
| लाभार्थी आय.डी :- | ता.कृ.अ. रजि.क्र |
| ॲप्लीकेशन फॉर्म क्र. | देयक - अ.क्र./दिनांक |

# महाराष्ट्र शासन

# कृषि विभाग

---

## राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान
## सन - २०१३ - २०१४

---

## तालुका कृषि अधिकारी

## --------, जि.------- कार्यालय

---

शेतक-याचे नावः-

गावः- तालुकाः- जिल्हाः-

कंपनीचे नांवः-

## शेतक-याचा अर्ज

१. शेतक-याचे नाव :

२. वडिलांचे नाव :

३. पतिचे नाव (लाभार्थी स्त्री असल्यास) :

४. जात प्रवर्ग :

५. गावाचे नाव :

६. तालुका :

७. जिल्हा :

८. शेतक-याचे खाते क्र :
बँकेचे नाव :
शाखा :
आय एफ सी कोड :

९. शेतक-याचे ८/अ प्रमाणे एकुण क्षेत्र (हे.) :

१०. सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या क्षेत्राचा सर्व्हे नंबर :

११. बसविलेली सूक्ष्म सिंचन पध्दती : ठिबक सिंचन संच
: तुषार सिंचन संच

१२. ठिबक सिंचन संच बसविलेलाअसल्यास,
पिकाचे नाव :
क्षेत्र :
लागवडीचे अंतर (मी.) :

१३. तुषार सिंचन संच असल्यास, प्रकार : पोर्टेबल
सेमी पर्मनंट
मिनी स्प्रिंकलर
मायक्रो स्प्रिंकलर
रेनगन

क्षेत्र :

१४. सिंचनासाठी उपलब्ध जलस्त्रोत : विहिर
ट्यूब वेल
ओपन वेल
उपसासिंचन
इतर

१५. कॅनालद्वारे पाणी घेत असल्यास,पाणी साठविण्यासाठी
व्यवस्था केलेली आहे काय? : होय / नाही.

असल्यास जलसाठ्याची लांबी x रुंदी x खोली (मी) :

१६. शेततळे उपलब्ध आहे काय? : होय / नाही.

असल्यास शेततळ्याची लांबी x रुंदी x खोली (मी) :

१७. विद्युत पंप असल्यास त्याची क्षमता (हॉर्स पॉवर) :

१८. डिझेल इंजिन असल्यास त्याची क्षमता (हॉर्स पॉवर) :

मी ------------ लिहून देतो की,

१) माझ्याकडे स्वतःचा पाण्याचा स्त्रोत उपलब्ध नसल्यामुळे मी ---------- या शेतक-याकडून पाणी उपलब्ध करुन घेणार असून त्यासाठी त्याची समंती घेतली आहे.
२) यापूर्वी --------- सर्व्हे क्रमांकावर ------- हे क्षेत्रासाठी ------ या वर्षात अनुदान घेतले असून आता प्रस्तावित क्षेत्रावर मागील १० वर्षात अनुदान घेतलेले नाही.
३) मी पुढील किमान ५ वर्ष सुक्ष्म सिंचन संच विकणार नाही, भाडयाने देणार नाही किंवा बक्षिस/भेट देणार नाही.

**लाभार्थी शेतक-याची स्वाक्षरी**
**संपूर्ण नाव :**

## जोडपत्र -१

**अ) ७/१२ उतारा**

ज्या क्षेत्रात सुक्ष्म सिंचन संच बसविला आहे त्या क्षेत्राचा पिकांची नोंद असलेला ७/१२ उतारा जोडावा (जर ७/१२ उता-यावर पिकाची नोंद नसल्यास संबधित तलाठ्याचा पिक घेतल्याचा दाखला जोडावा. जर हा दाखला प्राप्त झाला नाही तर संबधीत पिक घेतल्याबाबत शेतक-याचे घोषणापत्र घेण्यात यावे)

**ब) ८/अ उतारा**

शेतक-याचे नावे असलेले एकुण क्षेत्र दर्शविणारा ८/अ उतारा जोडावा

# <u>जोडपत्र -२</u>

**लाभार्थीच्या जमीनीचा नकाशा**

सुक्ष्म सिंचन बसविण्याचा सर्व्हे नंबर व तसेच चारही बाजूचे सर्व्हे क्रमांक (चतुर्सिमा) दर्शवण्यात यावेत.
( तलाठयाकडून चतु:सिमा मिळाली नाही तर साध्या पेपरवर कृषि सहाय्यकाने चतु:सिमा दाखविणे)

## <u>जोडपत्र -३</u>

### लाभार्थीचे बॅंक पासबूक

लाभार्थीचे राष्ट्रीयकृत बॅकेत किंवा ज्या बॅकेत आर.टी.जी.एस. प्रणालीची सुविधा आहे, त्या बँकेचे नाव व बँक खाते क्रमांक व फोटो दर्शविणा-या पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत जोडावी (संयुक्त खातेदार असल्यास संमतीपत्र जोडावे) पासबुकावर खातेदाराचा फोटो नसेल तर तो स्वतंत्रपणे अर्जासोबत जोडावा .

## <u>जोडपत्र -४</u>

## पाणी व मृद तपासणी अहवाल.

पुढील मृद चाचणी प्रयोगशाळा यांचे माती व पाणी तपासणी अहवाल ग्राहय धरण्यात यावेत.

१. जिल्हा मृद चाचणी प्रयोगशाळा
२. कृषि विद्यापीठांकडील प्रयोग शाळा
३. कृषि विज्ञान केंद्रांकडील प्रयोग शाळा
४. सहकारी संस्थांकडील प्रयोग शाळा
५. शासनामार्फत मृद आरोग्य अभियानांतर्गत अनुदान दिलेल्या मृद चाचणी प्रयोगशाळा.
६. साखर कारखान्याच्या मृद चाचणी प्रयोगशाळा.
७. शासकीय व खाजगी कृषि महाविद्यालयाच्या प्रयोगशाळा.
८. मृद व पाणी परिक्षणाच्या सुविधा उपलब्ध असलेल्या खत कंपन्यांच्या प्रयोगशाळा.
९. मानव विकास अभियानांतर्गत उभारणी करण्यात आालेल्या प्रयोगशाळा.

(**टीप :** तथापि जर हे दोन्ही अहवाल तयार/उपलब्ध नसतील तर त्यासाठी अनुदान प्रस्ताव थांबवु नयेत. जून २०१५ अखेर पर्यंत मुदत देऊन हे अहवाल प्राप्त करुन घ्यावेत व नंतर प्रस्तावास जोडावे.ही जबाबदारी संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांची राहिल. )

## जोडपत्र -५

## कुपन व पोस्टकार्ड मिळालेबाबतचा लाभार्थीची पोहोच.

श्री./सौ. रा. तालुका. जिल्हा.
पोहोच देतो/देते की, मला यांच्याकडून मा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ---- कार्यालयाचा संपूर्ण पत्ता लिहिलेले ३ पोस्ट कार्डस् पोस्टेज चार्जसहीत मिळालली आहेत तसेच ३ सर्व्हीस कुपन मिळाले आहेत. या बाबत माझी काही तक्रार नाही.

शेतक-याची सही

## जोडपत्र -६

## बील इनव्हॉईस

सुक्ष्म सिंचन संच साहित्याचे सर्व करासहित, कंपनीच्या अधिकृत वितरकाने स्वाक्षरीत केलेले बील. (व्हॅट क्रमांकासह)

## <u>जोडपत्र -७</u>

## ठिबक सिंचन संच - मोका तपासणी प्रपत्र

शेतक-याचे नाव ----------गाव ------- तालुका --------जिल्हा ------- स.नं. ------पीकाचे नाव ----
ठिबक सिंचना खालील क्षेत्र- सरासरी लांबी x रुंदी -----(मी.) -----हेक्टर. तपासणी दिनांक ----------

| अ.क्र. | बाब | बीलाप्रमाणे | | प्रत्यक्षात | |
|---|---|---|---|---|---|
| | | बीआयएस/ सीएमएल नं./ ब्रॅन्ड नेम | मी./संख्या | यएस/ सीएमएल नं./ ब्रॅन्डनेम | मी./ संख्या |
| १ | पाण्याच्या स्त्रोतचे अंतर | | | | |
| २ | मेन - लांबी व्यास | | | | |
| ३ | सबमेन - लांबी व्यास | | | | |
| ४ | लॅटरल - लांबी व्यास (मी.मी) | | | | |
| ५ | ड्रीपर - ऑनलाईन असल्यास संख्या इनलाईन असल्यास लांबी (मी.) | | | | |
| ६ | फिल्टर - स्क्रीन, सॅन्ड | | | | |
| ७ | बायपास असेंब्ली | | | | |
| ८ | कंट्रोल फ्लश व्हॉल्व्ह | | | | |
| ९ | ड्रीपरचा डीसचार्ज लॅटरलच्या सुरुवातीस व शेवटी एक तासापूर्वी व नंतर | | | | |
| १० | लॅटरलमधील प्रेशर गेज दिला आहे काय? असल्यास दाब- समान/असमान | | | | |
| ११ | इनलाईनसाठी इनलाईन पाईप वर्ग | | | | |
| १२ | विशेष शेरा (मार्गदर्शक सूचना परिच्छेद अन्वये या प्रपत्राच्या मागे लिहावे व त्यावर हुद्दा लिहून स्वाक्षरी करावी) | | | | |

**प्रमाणपत्र**

मी कृषि सहाय्यक /कृषि पर्यवेक्षक /मंडळ/तालुका कृषि अधिकारी, -------- ता. --------- जि. --------- प्रमाणीत करतो की, वरीलप्रमाणे मोका तपासणी केलेली असून ती वस्तूस्थितीदर्शक आहे. सदर प्रकरण अनुदानास पात्र आहे.

**स्वाक्षरी** **स्वाक्षरी**

**शेतकरी** **(अधिका-याचे संपूर्ण नाव)**

**कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/मंडळ/तालुका कृषि अधिकारी**

# जोडपत्र -७ (अ)

## तुषार सिंचन संच - मोका तपासणी प्रपत्र

शेतक-याचे नाव ----------गाव ------- तालुका --------जिल्हा ------- स.नं. ------पीकाचे नाव ----

तुषार सिंचना खालील क्षेत्र --------- निरीक्षण दिनांक ----------

| अ.क्र. | बाब | बीलाप्रमाणे | | प्रत्यक्षात | |
|---|---|---|---|---|---|
| | | परिमाण | संख्या | परिमाण | संख्या |
| १ | स्प्रिंकलर पाईप (६ मि. दाब २.५ कि/चौ.सें.मी. आयएस १४१५१ (पार्ट-१) (क्लास-२) १९९४ किंवा ॲल्युमिनियम पाईप मेन लाईन कपलरसह (आयएस-७०९२ प्रमाणे) | | | | |
| २ | नोझल / स्प्रिंकलर (गन मेटल) आयएस-१२२३२, पार्ट-१, १९८७ प्रमाणे किंवा ॲल्युमिनियम पाईप स्प्रिंकलर कपलरसह | | | | |
| ३ | रायझर पाईप (किमान २.५ फुट) किंवा रायझर क्विक कपलर | | | | |
| ४ | बेंड (९० डिग्री) किंवा रायझर क्विक कपलर कनेक्टर | | | | |
| ५ | स्प्रिंकलर बेस बॅटन ॲक्सेसरीसह किंवा नोझल/स्प्रिंकलर (गन मेटल) आयएस-१२२३२, पार्ट-१, १९८७ प्रमाणे | | | | |
| ६ | एन्ड प्लग | | | | |
| ७ | पंप कनेक्टींग निपल/स्क्रूड कपलर | | | | |
| ८ | प्रेशर गेज | | | | |
| | बेन्ड (९० डिग्री) | | | | |
| | मेटॅलीक सॅडल/बॅटन | | | | |
| ९ | विशेष शेरा (मार्गदर्शक सूचना परिच्छेद- --- अन्वये या प्रपत्राच्या मागे लिहावे व त्यावर हुद्दा लिहून स्वाक्षरी करावी) | | | | |

**प्रमाणपत्र**

मी कृषि सहाय्यक / कृषि पर्यवेक्षक /मंडळ/तालुका कृषि अधिकारी,, -------- ता. --------- जि. --------- प्रमाणीत करतो की, वरीलप्रमाणे मोका तपासणी केलेली असून ती वस्तूस्थितीदर्शक आहे. सदर प्रकरण अनुदानास पात्र आहे.

**स्वाक्षरी** **स्वाक्षरी**

**शेतकरी**

**(अधिका-याचे संपूर्ण नाव)**

**कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक/मंडळ/तालुका कृषि अधिकारी**

# जोडपत्र -८

## ग्राफ पेपरवर स्केलसह तयार केलेला सुक्ष्म सिंचन संचाचा आराखडा.

- सन २०१०-११ च्या मार्गदर्शक सुचनेनुसार कंपनी प्रतिनिधीच्या स्वाक्षरीने व ग्राफ़ पेपरवर स्केलसह सुक्ष्म सिंचन संचाचा आराखडा घेण्याबाबत नमुद केले होते.
- तथापि दि. १७/०२/२०१५ रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी पुणे यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीच्या वेळी मा.अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांनी दिलेल्या सुचना नुसार यापूर्वी बसविलेल्या व अनुदान प्रलंबित असलेल्या संचाचे अनुदान अदा करण्यासाठी ही अट स्थगित करण्यात येत आहे.
- त्याऐवजी जो अधिकारी/कर्मचारी मोका तपासणी करीन त्यानेच साध्या पेपरवर शेताची लांबी व रुंदी दर्शवुन त्यात विहिर,पंपीग युनीट,मेन,सबमेन व लॅटरल दाखवाव्यात.
- सदरचा आराखडा स्केलप्रमाणे नसला व लॅटरलची केवळ दिशा दर्शवुन त्यांची सरासरी लांबी व संख्या लिहिली तरी चालेल.

## जोडपत्र -९

## यापुर्वी अनुदान घेतलेबाबतचा दाखला

दाखला देण्यात येतो की, श्री. रा.
तालुका : जिल्हा : यांनी खाली दर्शविल्यप्रमाणे ठिबक सिंचनासाठी यापूर्वी अनुदान घेतेले आहे.

| अ.क्र. | वर्ष | पिकाचे नांव | क्षेत्र (हे.) | गट नंबर |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| एकूण:- | | | | |

स्वाक्षरी

मंडल कृषि अधिकारी

स्वाक्षरी

तालुका कृषि अधिकारी

# जोडपत्र -१०

## करारनामा

## (उत्पादक किंवा त्यांच्या प्रतिनिधीने शेतक-याबरोबर करावयाचा)

मी -------------- (ठिबक/तुषार सिंचन संचाचे राज्य शासन मान्यता प्राप्त उत्पादक) मे. -------- यांचे अधिकृत प्रतिनिधी असून खालील नमूद केलेल्या शेतक-याच्या शेतावर ठिबक/तुषार सिंचन संच पुरविला आहे व तो दिनांक ------- रोजी कार्यान्वीत करुन दिलेला आहे.

१) शेतक-याचे नाव ------- गाव ------ ता. ------- जिल्हा --------

२) पीक ------- क्षेत्र(हेक्टर) ------- गट क्रमांक --------

३) देयक क्रमांक ------- दिनांक ------- रक्कम रुपये --------

१) मी उत्पादक कंपनीच्या वतीने हमी घेतो की, पुरविलेल्या ठिबक/तुषार सिंचन संचातील सर्व साहित्य कृषि आयुक्तालयाने ठरवून दिलेल्या निकषानुसार योग्य दर्जाचे आहे.

२) जमिनीचा उतार, मातीचा प्रकार, खोली, पाण्याची क्षारता, जमिनीचा सामू माती परिक्षण अहवाल इत्यादी तांत्रिक बाबी तपासून संच बसविण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. ठिबक सिंचन संच व्यवस्थित कार्यान्वित राहण्यास कोणतीही तांत्रिक चूक राहिलेली नाही.

३) बसविलेल्या ठिबक सिंचन संचाची तपासणी केली असून सर्व ठिकाणी समान दाबाने पाणी मिळत आहे.

४) संचात बसविलेले साहित्य बीआयएस मार्कचेच व आयुक्त, कृषि यांच्याकडे माझ्या कंपनीने दिलेल्या मेकचेच आहेत.

५) शेतक-यास ठिबक/तुषार सिंचन संच कसा चालवायचा या बाबतचे प्रशिक्षण दिनांक ------- रोजी दिले आहे. संच व्यवस्थित कार्यान्वीत राहण्यासाठी शेतक-यांच्या शेतास नियमीत भेटी देण्यात येतील. तसेच ''विक्रीनंतरची सेवा'' देण्यात येईल.

६) संच तीन वर्षाच्या कालावधीत व्यवस्थित कार्यान्वित राहण्यासाठी कंपनीकडील तांत्रीक प्रतिनिधी शेतक-याच्या शेतास तिन वर्षापर्यंत शेतक-यांच्या मागणिनुसार व आवश्यकतेनुसार नियमित भेटी देईल. तसेच उत्पादक कंपनीमार्फत जिल्ह्याकरीता जे विक्रीपश्चात सेवा केंद्र सुरु केलेले आहे त्यामार्फत **विक्रीनंतरची सेवा** देण्यात येईल.

७) शेतक-याची संच चालविण्याबाबतची तक्रार मला प्राप्त झाल्यास माझ्याकडील प्रतिनिधी तक्रार मिळाल्याच्या सात दिवसाच्या आत प्रत्यक्ष शेतावर भेट देवून शेतक-याची अडचण ७ दिवसाच्या आत सोडविल.

८) ठिबक/तुषार सिंचन संच कसा चालावावा, प्रत्येक घटकाची कोणती निगा राखावी याबाबतची माहिती असलेली मराठी पुस्तिका शेतक-यास संच कार्यान्वीत झाला त्यावेळी दिली आहे.

९) मी सदर ठिबक/तुषार सिंचन संचाचा कोणताही घटक तांत्रिक दृष्टीने खराब झाला असेल तर तो तीन वर्षाच्या कालावधीपर्यन्त कंपनी बदलून देईल. (Performance Guarantee) या कालावधीत आराखड्यात दोष असल्याच्या कारणामुळे, किंवा इतर तांत्रीक कारणामुळे संच नाकाम झाल्यास मी शेतक-यास संचाची किंमत परत करण्यांस बांधील आहे.

१०) संचाच्या निरनिराळ्या भागाचे आयुष्य ५ वर्षांचे राहील. (Warranty Period) आम्ही पुरविलेला ठिबक सिंचन संच तो कार्यान्वीत झाल्यापासून दहा वर्षापर्यन्त वेगवेगळ्या घटकांच्या उत्पादनातील दोष किंवा कमी दर्जाची असल्यामुळे संच नाकाम झाल्यास त्यातील घटक / साहित्य विनामूल्य बदलून देऊ.

११) संच कार्यान्वीत केलेल्या दिवसापासून संचाची देखभाल व निगा राखण्याच्या संदर्भात तीन रासायनिक प्रक्रिया (आम्ल व क्लोरीन) मोफत करुन देण्यात येतील.

**या मुदतीत लाभार्थि शेतक-यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील.**

१. दिलेल्या सुचनांनुसार फिल्टरची वेळोवेळी व नियमीत स्वच्छता करणे.

२. संपूर्ण संचाचे नियमीतपणे फ्लशींग करेल.

३. जमिनीची वापसा स्थिती कायम योग्य राहण्यासाठी दिलेल्या सुचनांप्रमाणे चालविणे.

४. संचाची योग्य निगा व जोपासना राखण्यासंदर्भात संबंधीत उत्पादकांनी दिलेल्या तांत्रिक सूचनांचे योग्य पालन करणे.

५. शेवाळ, क्षार इत्यादी कारणामुळे ड्रीपर्स/इमीटर्स बंद होऊ नयेत यासाठी उत्पादकांनी सुचविल्याप्रमाणे क्लोरीन व आम्ल प्रक्रिया करणे.

वरीलप्रमाणे उत्पादक व लाभार्थी शेतक-यांमध्ये जबाबदारी पार पाडताना वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त, कृषि यांचा निर्णय अंतिम व संबंधीतांवर बंधनकारक राहील. आयुक्तांच्या निर्णयाशी समाधान न झाल्यास दोन्ही पक्षाला तक्रारीचे निराकरण करण्याकरीता ग्राहक मंच किंवा इतर न्याय कार्यप्रणाली वापरण्याचा अधिकार राहील.

स्थळ :
दिनांक :

उत्पादक कंपनीचा अधिकृत प्रतिनिधी -------            लाभार्थी शेतक-याची स्वाक्षरी/ अंगठा

प्रतिनिधीचे पदनामः उत्पादक कंपनीचा शिक्का.

साक्षीदार - १) श्री./श्रीमती --------- स्वाक्षरी / अंगठा,
२) श्री./श्रीमती --------- स्वाक्षरी / अंगठा

**टिप :- सदरचा करारनामा हा रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर केलेला असावा.**